महाराष्ट्र शासन

आज़ादी का अमृत महोत्सव

जल बिरादरी
JAL BIRADARI

# स्वातत्र्यांच्या अमृत मोहत्सव

## “चला जाणुया नदीला” अभियान

# नदीचे नाव:- उमा नदी

## जिल्हा:- चंद्रपूर

नदी प्रहरी सदस्य :- श्री.राहुल गुळघाणे श्री.अजय काकडे.

# चंद्रपूर जिल्ह्याविषयी माहिती..

चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील विदर्भ विभागात आहे.चंद्रपूरला आधी चांदा म्हणत असत. चंद्रपूर ही गोंड राज्याची राजधानी होती व नंतर 17 व्या शतकात नागपुरच्या भोसले मराठ्यांनी चंद्रपूर ताब्यात घेतले. इ.स.1981 ला चंद्रपूर जिल्ह्यातून नवा गडचिरोली जिल्हा वेगळा बनव लागेला. चंद्रपूर जिल्ह्याला काळ्या सोन्याची भूमी म्हणतात.कारण जिल्ह्यात अनेक कोळसा खाणी आहेत. चंद्रपूरात अनेक चुण्याच्या खाणी देखील आहेत.
तापमान किमान 7.1 ते कमाल 47.2 सें. च्या दरम्यान असते. पर्जन्यमान 1398 मि.मी. इतके आहे. जिल्ह्याचे हवामान उष्ण असून मुख्यत: तीन ऋतु आहेत. उन्हाळा- पावसाळा व हिवाळा. उन्हाळा मोठा व कडक असतो तर हिवाळा कमी कालावधीचा पण सौम्य असतो.

**महत्वाचे उद्योग:-** जिल्ह्यात बल्लारशहा कागद उद्योग, कोळसाखाणी, महाराष्ट्र राज्य औष्णिक विद्युत निर्मीती व सिमेंट (अल्ट्राटेक,अंबुजा,माणिकगड व ए.सी.सी.) हे महत्वाचे उद्योग आहेत. बाबा आमटेंचा आनंदवन आश्रम याच जिल्ह्यात आहे. ताडोबा व्याघ्र प्रकल्प हे या जिल्ह्याचे अजून एक वैशिष्ट्य आहे.

**जिल्ह्यातील पर्यटण स्थळे:-** घोडाझरी प्रकल्प, सात बहिणी तपोवन (नागभिड), अड्याळटेकडी (ब्रम्हपुरी), रामदेगी(चिमूर), असोलामेंढा तलाव(सावली), विंजासनलेणी, गवराळा गनपती (दोन्ही भद्रावती),व ताडोबा अंधारी व्याघ्र अभयारण्य व राष्ट्रीय उद्यान प्रकल्प.

*चंद्रपूर आणि आसपासच्या परिसरात उच्च दर्जाचा दगडी कोळसा मुबलक प्रमाणात आहे. म्हणून संपुर्ण भारतात चंद्रपूर Block Gold City(काळ्या सोन्याचे शहर) ह्या नावाने ऑळखले जाते.

*चंद्रपूर शहरालगत सिमेंटचे बरेच कारखाणे आहेत. उदा. Larsen and Toubro ( L&T), माणिकगड सिमेंट,Ultra Tech येथे महाकाली अर्थात कालीमातेचे एक प्रसिध्द देऊळ आहे.

**चंद्रपूर जिल्ह्या विषयीची वैशिष्ट्यपुर्ण माहिती..**

- लोकसंख्या - 20,71,101
- क्षेत्रफळ - 10,490 चौ.कि.मी
- एकूणगावे - 827
- तालुके -15
- साक्षरतेचे प्रमाण - 59.41%
- 1000 पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण - 946

*राष्ट्रीय महामार्ग क्र.9, राष्ट्रीय महामार्ग क्र. 10 व राष्ट्रीय महामार्ग क्र.11 या जिल्ह्यातून जातात.
जिल्ह्याच्या उत्तरेस नागपूर जिल्हा, भंडारा व वर्धा जिल्हा, पश्चिमेस यवतमाळ जिल्हा, पुर्वेस गडचिरोली जिल्हा, दक्षिणेस आदिलाबाद जिल्हा(आंध्रप्रदेश)आहे.

**मुख्यपिके** :-
तांदुळ(खरीप), कापुस, सोयाबीन, गहु, तूर, मुग, उदिड, मिरची ही उत्पादने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात घेतले जाते.

गरम आणि मसालेदार रस्सा आणि करीयांचे पदार्थ चंद्रपूर मधील लोकांचे आवडते आहे. भरीत आणि भाकर, चकली, चिवडा, अळुवडी आणि कोधि मिरवडी हे काही चंद्रपूर मधील प्रसिध्द नाश्ताचे प्रकार आहेत.

येथे आदिवासी, गोंड आणि किर्तम नृत्याचे प्रकार प्रसिध्द आहे जे जगभर लोकप्रिय आहेत. चांगलेच प्रसिध्द आहे.

- चंद्रपूर मध्ये गणेश उत्सव, दसरा, दिवाळी आणि मकरसंक्रांती हे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे करतात.
- चंद्रपूर हे शहर नागपूर पासून 104, अमरावती पासून 252, मुंबई पासून 828, औरंगाबाद 514 आणि पुणे पासून 351 कि.मी. अंतरावर आहे.
- रेल्वे, बससेवा आणि खाजगी वाहनांनी चंद्रपूर चांगल्यातरेने जोडली गेली आहे.
- चंद्रपूर येथे ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प आहे.
- .चंद्रपूर आयुध निर्माण आहे.
- बाबा आमटेंचा आनंदवन आश्रम याच जिल्ह्यात आहे.

**उद्योग:-** जिल्ह्यात चंद्रपूर, बल्लारशहा, भद्रावती, वरोरा व मुल या ठिकाणी औद्योगिक वसाहती आहेत. जिल्ह्यात महाऔष्णिक विद्युत केंद्र हे सद्यास्थितीत 2920 मेगावॅट स्थापित क्षमता असलेले विद्युत निर्मीती केंद्र आहे. महाराष्ट्राला नियमित आणि स्वस्थ दरात वीज पुरवठा करण्यात चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे मोठे योगदान आहे. भद्रावती येथे आयुध निर्माण प्रकल्प आहे.

| **अ.क्र.** | **उद्योग/ व्यवसाय** | **ठिकाण** |
|---|---|---|
| 1. | महाऔष्णिक विद्युत केंद्र | चंद्रपूर |
| 2. | आयुध निर्माण प्रकल्प | भद्रावती |
| 3. | वर्धा पॉवर प्लांट | वरोरा |
| 4 | सिमेंटप्लांट | गडचांदूर |
| 5. | भातसंशोधनकेंद्र | सिंदेवाही |
| 6. | पेपरमिल | बल्लारशहा |

**चंद्रपूर जिल्ह्यातील नद्या :-**

इरई नदी हि जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. ही नदी वर्धा नदीला मिळते. चंद्रपूर हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण वर्धा नदीकाठी वसले आहे. याशिवाय अंधारी नदी,पैनगंगा नदी आहेत.

**चंद्रपूर जिल्ह्यातील धरणे:-**

चंद्रपूर जिल्ह्यात वर्धा नदी, इरई नदी, वैनगंगा नदी, अंधारी नदी, पैनगंगा नदी या बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत. या सर्व नद्या उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहतात. या नद्यांवर इरई धरण, चारगाव धरण, अमलनाला धरण, जिवती धरण, मानोरा धरण व घोडाझरी धरण ही काही महत्वाची धरणे देखील आहेत.

**जिल्ह्यातील धार्मिक स्थळे:-** दीक्षाभूमी, चंद्रपूर दीक्षाभूमी हे चंद्रपूर शहरातील आणि नागपूरच्या दीक्षाभूमी खालोखाल भारतातील बौद्ध धर्मियांचे प्रमुख बौद्ध तिर्थस्थळ आहे. इथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 16 ऑक्टोबर 1956 रोजी आपल्यातीनलाखांपेक्षा अधिक अनुयायांना नवयान बौद्धधम्मची दीक्षा दिली होती.

महाकाली मंदिर- सुमारे 16 व्या शतकात गोंड राज घराण्यातील आदिवासी राजा धंद्याराम साहयांनी हे प्राचीन मंदिर बांधले. इथे चैत्र पौर्णिमेला महाकालीची भरणारी यात्रा अतिशय प्रसिद्ध आहे.

भद्रावती जैन मंदिर- शिल्पकला आणि नक्षी कामासाठी हे मंदिर प्रसिद्ध आहे.

अंचलेश्वर मंदिर- गोंड किल्ल्यासमोर हे भगवान महादेवाचे मंदिर आहे.

**चंद्रपूर जिल्ह्यातील नद्या:-**

उमा नदी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. ही नदी जिल्ह्यातून साधारणत:१५० कि.मी. प्रवास करते. ही नदी चिमूर, सिंदेवाही, मुल पोंभुर्णा तालुक्यातून वायव्येकडून आग्नेयेकडे वाहते. पिटीचुआ हे उमा नदीचे उगमस्थान आहे. उमा नदीचे उप नदी बोकडदोह नदी व गोदरी नदी ही उमा नदीच्या उपनद्या आहेत. उमा व गोंदोंडा नद्यांचा संगम वडसी गावाजवळ होतो. चंद्रपूर जिल्ह्यातील उमा नदीचा समावेश महाराष्ट्र शासनाच्या “चला जाणुया नदीला” या अभियानात आहे.

## चला जाणुया नदीला या अभियानाविषयी थोडक्यात माहिती..

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्ष पूर्ण झाल्याने संपूर्ण देशभरामध्ये “स्वतंत्र्याच्या अमृत महोत्सव” हा उत्सव वेगवेगळे उपक्रम साजरे करून मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला जात होता. या काळात तात्कालीन व नव सांस्कृतिक कार्य मंत्री मा.श्री. सुधीर मुनगंटीवार आणि जागतिक जलतज्ञ जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंहजी यांची भेट झाली. चर्चा करत असताना जल पुरुष डॉ. राजेंद्रसिंहजी यांनी एक मुद्दा मांडला तो म्हणजे, आपण संपूर्ण देशभरात त्याच प्रमाणे आपल्या महाराष्ट्रात ही स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. 1947 सली जेंव्हा देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा मात्र आपल्या नद्या अमृतवाहिनी होत्या. त्याशुध्द, अविरल आणि निर्मळ वाहत होत्या. म्हणजेच आपल्या नद्यांमधून अमृतवाहत होते. आता आपल्या नद्या अमृत वाहिनी राहिल्या आहेत का? का त्या विषवाहिनी झाल्याआहेत. आपल्या नद्यांमध्ये जर अमृत वाहत नसेल तर आपण अमृत महोत्सवीवर्ष कसे साजरे करू शकतो. डॉ. राजेंद्रसिंहजी पुढे बोलताना म्हणाले आपल्या देशातील 99% नद्यांचा उगम हा वन जमिनीतून होतो. त्यामुळे वन विभागाने पुढाकार घेऊन नद्यांची सद्यपरिस्थिती जाणून घेण्यासाठी अभ्यास दौरा करून नदिला शुध्द,अविरल आणी निर्मळ(अमृतवाहिनी) म्हणजेच महाराष्ट्राला पुर आणि दुष्काळमुक्त बनवण्यासाठी काय करणे गरजेचे आहे या संदर्भातकृत आराखडा तयार करण्याच्या दृष्टहीने नद्यांची यात्रा करणे अत्यंत गरजेचे आहे.

या नदी यात्रेला(अभ्यास दौऱ्याला) "चला जाणुया नदीला" असे नाव देण्यात आले. महाराष्ट्र शासनाने 30 सप्टेंबर 2022 रोजी 'शासन निर्णय' निर्गमित केला या शासन निर्णयाद्वारे मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली तर प्रधान सचिव वने यांच्या कार्याध्यक्षतेखाली 'चला जाणुया नदीला' या अभियानाची एक राज्यस्तरीय समितीची गठित केली. या समितीत मध्ये शासनाचे वेगवेगळ्या विभागाचे प्रधान सचिव आणि जलबिरादरीच्या व्यक्तींची अशासकीय सदस्य म्हणून आशा एकूण 30 सदस्यांची निवड करण्यात आली.

1. महाराष्ट्राला वारंवार भेडसावणाऱ्या पूर आणि दुष्काळ या समस्यापासून मुक्तीसाठी नदी संवाद अभियानाचे आयोजन करणे.

2. अभियानांतर्गत जनसामान्यांना नदी साक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे व अंमलबजावणीसाठी यंत्रणा निश्चित करणे.

3. नदीला अमृतवाहिनी बनवण्यासाठी मसुदा तयार करणे.

4. नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार व प्रसार रूपरेषा आखणे.

5. नदीचा तट, प्रवाह, जैवविविधतेबाबत प्रत्येक जिल्ह्यात प्रचार व प्रसार या बाबत नियोजन करणे.

6. नदीच्या पाणलोट क्षेत्राचा अभ्यास करून त्यावर संबंधितांना कार्यवाही अहवाल सादर करणे.

7. पावसाचे पाणी योग्य जागी अडवून भूजलस्तर उंचावणे, जनजागृती करण्याबाबत आकृतीबंध तयार करणे.

8. अतिक्रमण, शोषण आणि प्रदूषण या तीन प्रमुख कारणांचा अभ्यास आणि त्याचा नदी आणि मानवी जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे व त्याचा प्रचार व प्रसार करणेबाबत आखणी करणे.

9. महाराष्ट्रातील सुमारे 75 नदीखोऱ्यातून नदी संवाद यात्रा आयोजित करण्याबाबत आराखडा तयार करून अंमलबजावणी करणे.

10. शासन, समाज आणि नदीवर काम करणाऱ्या संस्थे मध्ये सुसुत्रता आणण्यासाठी प्रयत्न करणे.

11.स्थानिक स्वराज्य संस्था(ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका) यांचे जलव्यवस्थापन अभ्यासणे, त्यातील उणीवा आणि उत्कृष्ट उदाहरणे अभ्यासणे, त्याचे निराकरण करण्यास लोकसंवाद घडविणे.

12. नदी, समाज आणि शासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करणे.

आशा एकूण 12 गोष्टींचे ध्येय आणि उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून “चला जाणुया नदीला” या राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. या अनुषंगाने 02 ऑक्टोंबर 2022 रोजी महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी वर्धा जिल्ह्यातील महात्मा गांधी यांच्या सेवाग्राम आश्रमातून महाराष्ट्राचे तात्कालीन उपमुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस, तात्कालीन वने व सांस्कृतिक कार्य मंत्री मा.श्री.सुधीर(भाऊ) मुनगंटीवार आणि जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंहजी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये “चला जाणुया नदीला” या अभियानाची सुरुवात करण्यात आली. या अभियाना अंतर्गत गेल्या 2 ते 3 दशकांपासून नदीवर स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या नदी प्रहरी यांची तीन दिवसीय कार्यशाळा जल पुरुष डॉ. राजेंद्रसिंहजी यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली.

चला जाणूया नदीला या अभियानाच्या अंतर्गत महाराष्ट्रातील 75 नद्या निवडून त्यावर यात्रा करून महाराष्ट्राला पुर व दुष्काळ मुक्त कण्याच्या उद्देशाने नद्या अमृत वाहिनी(शुध्द,अविरल आणि निर्मळ) बनवण्यासाठी त्यांचा “सद्यपरिस्थिती अहवाल” आणि “कृती आराखडा” करण्याचे निश्चित करण्यात आले. परंतु महाराष्ट्रातील गोदावरी खोरे, कृष्णा खोरे, तापी खोरे, नर्मदा खोरे आणि पश्चिम वाहिनी वाहणाऱ्या नद्या आशा 5 प्रमुख नदीखोऱ्यातुन एकूण 108 नद्यांची निवड "चला जाणूया नदीला" अभियानात करुन या 108 नदीची यात्रा सुरू झाली.

या 108 नद्यांची सुची आणि वरील ठरल्याप्रमाणे 12 उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून प्रत्यक्ष कार्यकरण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 14 ऑक्टोंबर 2022 रोजी एक शासन निर्णय निर्गमित करून एक जिल्हास्तरावर "चला जाणुया नदीला" या अभियानाची जिल्हास्तरीय समिती गठीत केली. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदयांच्यासह अध्यक्षतेखाली शासनाचे वेगवेगळे 27 विभाग व प्रत्येक नदीवर 2 अशासकीय सदस्य अशी या समितीची रचना करण्यात आली. या समिती अंतर्गत वरील 12 कार्य उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून प्रत्यक्ष नदी यात्रा करण्याचे निश्चित करण्यात आले. या अभियानाला बळकट करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 30 सप्टेंबर 2022, 14 ऑक्टोंबर 2022, 29 नोव्हेंबर 2022 आणि 20 जानेवारी 2023 आसे एकुण 4 शासन निर्णय निर्गमित केले आहेत. वरील 108 नद्यांमध्ये वैनगंगा खोऱ्यातील प्रामुख्याने चंद्रपूर जिल्ह्यातील उमा नदीचा समावेश या" चला जाणुया नदीला" अभियानात करण्यात आलेला आहे.

## चिमूर तालुक्यातील उमा नदी बाबत थोडक्यात माहीती

उमा नदीचा उगम चिमूर तालुक्यातील पिटीचुआ गावापासून झाला आहे. चिमूर तालुक्यात ३२ कि.मी. अंतर नदी प्रवास करते. या चिमूर तालुक्यातील नदीकाठावर एकुण १५ गावे आहेत. यामध्ये पिटीचुआ. शेडेगाव. सोनेगाव बेगडे. चिमूर शहर ,कवडशी रोडी, काग.सरडपार, म्हसली, उसेगाव, वाघेडा, गोंदेडा, वडसी व खातोडा या गावांचा समावेश आहे. चिमूर नगरपरिषदेतर्गत एकूण ६ गावे आहेत. चिमूर तालुका पाणीटंचाई व पुरग्रस्त समजला जातो. उमा नदी पात्रात चिमूर तालुक्यात एकुण ०७ कोल्हापुरी बंधा-याचे बांधकाम झालेले आहे. परंतु त्यामधे चिमूर शहरातील जलशुध्दीकरण यंत्राजवळील बंधारा चिमूर नगरपरिषदेने बांधकाम केल्याचे निर्दशनात आले. उमा नदीचे उगमस्थान चिमूर तालुका असल्यामुळे नाल्यासारखी नदी पाहायला मिळते. तसेच नदीपात्रात मोठ्या प्रमाणात गवती साम्राज्य दिसून येते. उमा नदी व भिसी नाल्याचा संगम सरडपार गावाजवळ झालेला आहे. भिसी नाला ३२ कि.मी. प्रवास करत असून यावर एकूण १९ गावे आहेत. तसेच या नाल्यावर १३ कोल्हापुरी बंधा-याचे बांधकाम झाल्याचे दिसून येते. उमा नदीकाठावर गावे लागून असल्यामुळे गावातील सांडपाणी थेट नदी पात्रात सोडले जाते. त्यामुळे नदी प्रदुषित होत आहे. उमा नदीच्या उगमापासून ते सरडपार संगमापर्यत खोलीकरणे करणे अत्यंत आवश्यक आहे.

## सिंदेवाही तालुक्यातील उमा नदी बाबत थोडक्यात माहीती

उमा नदी ही सिंदेवाही तालुक्यातून ३६ कि.मी.अंतर प्रवास करते. या नदीकाठावर एकुण ९ गावे आहेत. त्यामध्ये शिवणी, गडबोरी, जामसाळा, मोहाळी, कळमगाव, विरव्हा, सरडपार व पेटगाव या गावांचा समावेश आहे. या नदीपात्रात उमा नदीची उपनदी म्हणजे बोकडदोह नदीचा संगम हा सिंदेवाही तालुक्यातील कळमगाव गावाजवळ झाला आहे. या बोकडदोह नदीवर एकूण १८ गावे असून ०५ कोल्हापुरी बंधा-याचे बांधकाम झाले आहे. तसेच जामसाळा पासून नाला उमा नदीला मिळत आहे. या नाल्यावर २ गावे असून २ बंधा-याचे बांधकाम झाल्याचे दिसून येते.

# “उमा नदी अहवाल”

## उमा नदीचा परिचय:-

⁎ उमा नदी ही वैनगंगा नदीची सर्वात महत्वाची उपनदी आहे.

⁎ उमा नदीचा उगम चिमूर जिल्ह्यातील चिमूर, तालुक्याच्या पिटीचुआ गावाजवळ होतो.

⁎ या नदीची लांबी १५० कि.मी.असून, चंद्रपूर जिल्ह्यातून चिमूर, सिंदेवाही, मुल व पोंभुर्णा तालुक्यातून वाहते.

⁎ महाराष्टात उमा नदीचे चिमूर, सिंदेवाही, मुल व पोंभुर्णा या चार तालुक्यात आहे. या पाच तालुक्यातील ३६ गांवे उमा नदीखोऱ्यात आहेत.

⁎ उमा नदीच्या प्रमुख २ उपनद्या बोकडडोह नदी,गोदरी नदी.

## उमा नदीचा इतिहास-

उमा नदीचा उगम चिमूर तालुक्यतील पिटीचुआ गावाजवळ झालेला आहे. हि नदी चिमूर, सिंदेवाही, मुल व पोंभुर्णा या चार तालुक्यातून साधारनत: 150 कि.मी.अंतरावर वाहत आहे. चिमूर तालुका उमा नदीचा उगमस्थान असल्यामुळे नदीचे पात्र पिटीचुआ ते सरडपार गावापर्यत लहान स्वरुपाचे आहे. उमा नदीच्या पात्रात पाणी अडविण्यासाठी विविध ठिकाणी कोल्हापुरी बंधा-याचे बांधकाम झाल्याचे दिसून येते.परंतु या बंधा-याचे नियोजन नसल्याकारणाने नदीकाठावरील गावांना मुख्यता चिमूर तालुक्यातील गावांना पुराचा सामना करावा लागतो. यामध्ये काग, उसेगाव, सोनेगाव बेगडे, शेडेगाव, या गावांचा समावेश आहे.

## नदी काठाची गावे :-

पिटीचुआ, मुरपारतुकूम, शेडेगाव, सोनेगाव बेगडे, सोनेगाव सिरस, चिमूर, काग, सरडपार, म्हसली, उसेगाव, वाघेडा, वडसी, गोंदेडा, खातोडा, सरांडी, पिपर्डा, पळसगाव, शिवणी, गडबोरी, वासेरा, जुना जामसाळा, मोहाळी, कळमगाव गन्ना, कळमगाव तुकूम, इटोली, विरव्हा, सरडपार, पेटगाव, रत्नापूर, भादुर्णी, उश्राळा,कोसंबी माल, कोसंबी चक, मोरवाही, मुल, ताडाळा, चिचाळा, भेजगाव, नलेश्वर

## नदी खोऱ्यातील गावे:-(चिमूर तालुक)

पिटीचुआ, शेडेगाव, सोनेगावबेगडे, सोनेगावसिरस, चिचलामाणुसमारी,कवडशी, केसलापूर, भिलगाव, बाम्हणी, काग,सरडपार,म्हसली, नेरी,मोरवाडा, उसेगाव, खांबाडा, भिसी, चिखलगाव, कन्हाळगाव, जाबगाव, येरखेडा, मिनझरी, पेठ, पिपळनेर, खरकाडा, गडपिपरी, कळमगाव, गौरखेडा, मालेवाडा, उमरी, कारगट्टा, चिखलपार, सावरगाव, खुटाळा, नवेगावबाम्हणी, नवेगाव, सिरजपूर, परडी, मंगळगाव, मेटेपार, कोटगाव, बोर्डा, सिवनपायली, सिखुर, सिवरा, कवडशी, पिपळगाव, गोरवट, मोटेगाव, केवाडपेठ, हरमी, महादवाडी, गोंदेडा, खातोडा, वडसी, वाघेडा, पळसगाव, पिपर्डा, डोंगरगाव, लोहाराचक, जातेपूरचक, डोमा, खापरी, नवतळा, बोथली

## नदी खोऱ्यातील गावे :-(सिंदेवाही तालुका)

शिवणी, नाचनभट्टी, उमरवाही, वासेरा, जामसाळा, मिनघरी, देवाडा, रामाळा, टेकरी, वानेरी, वाकल, कळमगाव गन्ना, कळमगाव तुकूम, मोहाळी, इटोली, विरव्हा, सरडपार, पेटगाव, देलनवाडी, चिखल मिनघरी, किन्ही, मुरमाडी,

## नदी खोऱ्यातील गावे :-(मुल तालुका)

शिवापूर, रत्नापूर, डोंगरगाव, भादुर्णी, उसराळा, मारोडा, कोसंबी, मोरवाही, मुल, ताडाळा, चिचाळा, हल्दी, हेटी, भेजगाव, येजगाव, दहेगाव, मानकापूर, नलेश्वर, पांढरसडा, चारगाव, सादागडहेटी, बोथली, चिमढा, चितेगाव, आकापूर

## नकाशे:- तालुका चिमूर,सिंदेवाही,मुल






# चंद्रपूर जिल्हा नकाशा

**२. तालुका - सिंदेवाही**



**उमा नदी खोरे नकाशा:-**




Scanned with CamScanner

## ३.चंद्रपूर जिल्हा भौगोलिक माहिती व नकाशा:-

चंद्रपूर जिल्ह्याचे एकून क्षेत्रफळ सुमारे 11,443 चौरस किलोमीटर आहे.चंद्रपूर जिल्ह्यात एकूण 15 तालुक्यांचा समावेश होतो.यामध्ये चंद्रपूर, मुल, सावली, भद्रावती, वरोरा, चिमुर, ब्रम्हपुरी, नागभीड, सिंदेवाही, गोंडपिंपरी, पोंभुरणा, राजुरा, कोरपना, बल्लारशहा आणि जिवती या तालुक्यांचा समावेश होतो. येथील लोकसंख्या सुमारे 21 लाख 94 हजार 262 इतकी आहे.

# (चिमूर,सिंदेवाही,मुल)


Village Map
Taluka: Chimur
District: Chandrapur
Location Index
Maharashtra State
District: Chandrapur
Legend
Taluka Head Quarter
Railway
National Highway
State Highway
District Boundary
Taluka Boundary
Village Boundary
Waterbody/River
Generated By:
Maharashtra Remote Sensing Applications Centre
Umred
Samudrapur
Warora
Nagbhir
Sindewahi
Pauni
Bhiwapur
CHIMUR


Village Map
Taluka: Mul
District: Chandrapur
Location Index
Maharashtra State
District: Chandrapur
Legend
Taluka Head Quarter
Railway
National Highway
State Highway
District Boundary
Taluka Boundary
Village Boundary
Waterbody/River
Generated By:
Maharashtra Remote Sensing Applications Centre
Sindewahi
Sawali
Chandrapur
Chamorshi
Pombhurna
MUL


Village Map
Taluka: Sindewahi
District: Chandrapur
Location Index
Maharashtra State
District: Chandrapur
Legend
Taluka Head Quarter
Railway
National Highway
State Highway
District Boundary
Taluka Boundary
Village Boundary
Waterbody/River
Generated By:
Maharashtra Remote Sensing Applications Centre
Chimur
Nagbhir
Brahmapuri
Bhadravati
Chandrapur
Mul
Sawali
SINDEWAHI
Asola Mendha Tank
Naleshwar Tank

## उमा नदीचे टोपोशीट:-



# नदी खोर्यातील पिक पध्दती:-

उमा नदीचे खोरे हे चिमूर, सिंदेवाही व मुल या तिन तालुक्यानी बनलेले असून या नदीखोऱ्यामध्ये पीकपद्धती मध्ये वेगवेगळेपणा दिसून येतो. यामध्ये प्रामुख्याने चिमूर तालुक्यात धान व कापुस मोठ्या प्रमाणात आढळून येतो. तर सिंदेवाही आणि मुल तालुक्यात धान पिक घेतले जाते. तसेच प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर आधारित किंवा पावसाळा संपल्यानंतर एखादा दुसरे पाणी देता येईल अशा स्वरूपाची पिके या तीनही तालुक्यांमध्ये घेतली जातात.

एकंदरीत उमा नदीखोऱ्यातील पीकपद्धतीचा विचार केला असता यामध्ये सर्व प्रकारच्या भाजीपाल्याचे उत्पादन ज्यामध्ये मिरची, टोमॅटो, वांगी, काकडी, दोडका, कारले, डांगर भोपळा, या **फळभाज्या** तसेच मेथी, कोथिंबीर, पालक, यांसारख्या **पालेभाज्या** मोठ्या प्रमाणात घेतल्या जातात.

आपण जर या उमा नदी खोऱ्यातील **फळपिकाचे** क्षेत्र पाहिले असता यामध्ये आंबा, बोर, पेरु, सिताफळ या दोन पिकावर मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी शेताच्याकडेला लागवड केल्याचे दिसून येते. एकंदरीत उमा नदीखोऱ्याच्या पीकपद्धतीचा आभ्यास केला आसत या खोऱ्यात **धानपिक फळ भाज्या, पालेभाज्या, फळपिके, चारापिके** तसेच **उस, कापूस** यासारखी वार्षिक पिके शेतकरी घेत आसल्याचे निदर्शनास आले.

## १. सांडपाणी व घनकचरा बाबत माहीती

| अ. क्र. | उमा नदी पाणलोट क्षेत्रातील सांडपाणी बाबत गावे | उपाययोजना | फोटो |
|---|---|---|---|
| १. | शेडेगाव ता.चिमूर जि.चंद्रपूर | उमा नदी काठालगत असलेले शेडेगाव गाव आहे. या गावातील सांडपाणी व घनकचरा नालीद्वारे नदी पात्रात सोडले जाते. तसेच गावाची स्मशानभुमी पण नदी काठावर असून गाळणे व जाळणे नदीपात्रातच केले जाते. त्यामुळे नदीकाठावरील गावे नदीला प्रदुषित करीत असल्याचे दिसून येत आहे. |  |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | सोनेगाव बेगडे ता. चिमूर जि.चंद्रपूर | उमा नदी काठालगत असलेले सोनेगाव बेगडे गाव आहे. या गावातील सांडपाणी व घनकचरा नालीद्वारे नदी पात्रात सोडले जाते. तसेच मोठ्या प्रमाणात नदीत गाळ व त्यामुळे नदीकाठावरील गावे नदीला प्रदुषित करीत असल्याचे दिसून येत आहे. |  |
| ३. | चिमूर शहर | मासळ रोडवरील उमा नदीच्या पात्रात चिमूर नगरपरिषदेचा संपुर्ण घनकचरा उदा-प्लॉस्टी, मार्केटमधील कचरा, घरगूती व सार्वजनिक टाकाऊ कचरा हा उमा नदीच्या पात्रातच टाकला जातो .त्यामुळे मोठ्या प्रमाणात चिमूर शरापासून प्रदुषित होत आहे . |  |
| ४. | सातनाला ता.चिमूर, जि.चंद्रपूर | चिमूर शरातून वाहत येणारा सातनाला हा चिमूर शहराचा संपुर्ण सांडपाणी आणत आहे. शेवटी सातनाला हा उमा नदीला मिळत आहे. त्यामुळे चिमूर शहराची संपुर्ण सांडपाणी उमा नदीत जाऊन मोठ्या प्रमाणात प्रदुषित होत आहे. |  |
| ५. | चिमूर येथिल स्मशानभुमी | चिमुर नगरपरिषदेची स्मशानभूमी उमा नदीच्या तिरावर आहे. माणसे जाळणे - गाळणे नदी पात्रातच केले जाते .त्यामुळे राख व उरलेली खोड नदी पात्रातच असतात. नतर खोडी समोर बंधा-याला अडकत असतात .आणि पाण्यचा प्रवाह कमी होऊन पुर येण्यास कारणीभूत ठरत आहेत . |  |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | काग ता. चिमूर, जि. चंद्रपूर | काग गाव उमा नदीकाठावर वसलेले आहे. नदीत गावातील घनकचरा व सांडपाणी सोडत असल्यामुळे नदी प्रदुषित होत आहे. या पात्रात विविध ठिकाणी गवती साम्राज्य दिसून येते . तसेच डोहाच्या ठिकाणाहून मोटारपंपाणे .पाणी उपसा करतांना परिस्थीती दिसून येते या काग गावाजवळील नदीच्यापात्रात स्वच्छता करणे गरजेचे आहे . |  |
| ६. | उसेगाव ता. चिमूर, जि. चंद्रपूर | उमा नदी ही उसेगाव गावाला लागून वाहत आहे. उसेगाव गावातील सांडपाणी व घनकचरा उमा नदीच्या पात्रात टाकला जातो. तसेच गावची स्मशानभूमी नदी पात्रातच आहे. तसेच उमा नदी जवळ असल्यामुळे गावतील नागरीक शौचास देखील नदी पात्रात जात असतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नदी प्रदुषित होत आहे. |  |
| ८. | वडसी ता. चिमूर , जि. चंद्रपूर | वडसी गावाची स्मशानभूमी उमा नदीच्या तिरावर आहे. माणसे जाळणे -गाळणे नदी पात्रातच केले जाते .त्यामुळे राख व उरलेली खोड नदी पात्रातच असतात. नंतर खोडी समोर बंधा-याला अडकत असतात . आणि पाण्यचा प्रवाह कमी होऊन पुर येण्यास कारणीभूत ठरत आहेत. |  |
| ९. | शिवनी ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर | सिंदेवाही तालुक्यातील शिवणी गावाजवळून वाहत आहे .शिवणी गावाच संपुर्ण सांडपाणी नालीद्वारे नदीला जात आहे . नदीच्या पात्रात विविध गावच्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम झाल्याचे दिसून येते . |  |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | पेटगाव ता.सिंदेवाही जि.चंद्रपूर | उमा नदी ही पेटगाव गावापासून वाहत आहे. पेटगाव नदीच्या किनारी मंदिर असल्यामुळे येथे जेवणासाठी भाविकभक्त येत असतात. व्यर्थ गेलेला अन्न व प्लॉस्टीक, पत्रावळ नदी पात्रात टाकल्या जाते. त्यामुळे नदी प्रदुषित होत आहे.तसेच राजोली गावाची स्मशानभूमी उमा नदी किनारी आहे. |  |
| ११. | भादुर्णी ता. मुल, जि. चंद्रपूर | उमा नदी ही भादुर्णी गावाला लागून वाहत गेलेली नदी आहे. या पात्रातील नदीची रुंदी व खोली मोठ्या प्रमाणात असली भादुर्णी गावाला पुराचा सामना करावा लागते. गावाची स्मशानभुमी नदीपात्रात आहे. गावातील अत्यसंस्कार नदीपात्रात केले जाते. त्यामुळे राख व इतर कचरा नदी पात्रात राहत असल्यामुळे नदी प्रदुषित होत आहे. |  |

# उमा नदी वरील बंधाऱ्यांची माहीती. :-

| अ. क्र. | बंधा-याचे नाव | Lottitude | Longitude | कामाचे नाव बंधारे विषेश दुरुस्ती व -: व्यवस्थापन करणे | | अपेक्षीत फायदे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बंधायाची विशेष दुरुस्ती- | व्यवस्थापन | |
| १. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा शेडेगाव ता. चिमूर , जि. चंद्रपूर | 20.516031 | 79.320147 | १ याला पाट्या-बंधा .<br>२ याच्या दोन्ही-बंधा . बाजुला ५०० मीटर पर्यत खोलीकरण<br>३ याची गर्जेनुसार-बंधा . दुरुस्ती | बंधाऱ्याच्या पाट्या वेळेवर काढणे व टकणे, देखभाल दुरुस्तीचे व्यवस्थापन करण्यासाठी पाणी वापर संस्था स्थापन करुन सक्षमीकरण करणे, | १. सिंचन क्षेत्रात वाढ,<br>२. भुजल पातळीत वाढ होण्यास मदत<br>३. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल ( मनुष्य, पाळीव व वन्य प्राणी, पक्षी )<br>४. जैवविविधता समतोल राखण्यासाठी उपयुक्त ठरेल.<br>५. शेतकरी वर्गांना एकत्र येऊन शासणाच्या विविध सामुहीक योजनांचा लाभ मिळेल. |
| २. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा सोनेगाव बेगडे ता. चिमूर, जि. चंद्रपूर | 20.508193 | 79.337073 | | | |
| ३. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा चिमुर जि. चंद्रपूर | 20.495453 | 79.358473 | | | |
| ४. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा स्मशानभुमीजवळ, चिमूर जि. चंद्रपूर | 20.483917 | 79.377399 | | | |
| ५ . | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा काग ता. चिमुर जि. चंद्रपूर | 20.464847 | 79.414277 | | | |
| ६. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा काग ता. चिमुर जि. चंद्रपूर | | | | | |
| ७. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा सरडपार ता. चिमुर जि. चंद्रपूर | 20.457713 | 79.431739 | | | |
| ८. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा गोंदेडा ता. चिमुर जि. चंद्रपूर | 20.40563 | 79.472337 | | | |
| ९. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा बोथली ता. चिमुर जि. चंद्रपूर | 20.4741 | 79.516219 | | | |
| १०. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा नवतळा ता. चिमुर जि. चंद्रपूर | 20.522202 | 79.501463 | | | |
| ११. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा पिपळगाव ता. चिमुर जि. चंद्रपूर | 20.546157 | 79.486157 | | | |
| १२. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा शिवणी ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर | | | | | |
| १३. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा सरडपार ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर | 20.221788 | 79.657912 | | | |
| 14. | कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा पेटगाव ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर | 20.191501 | 79.665144 | | | |

## उमा नदीवरील उप नदी व  उपनाल्याबाबत माहीती

| नाला | उमा नदीचे उप नाले व उप नदी नावे | उमा नदीचे उप नाले व उप नदींचे स्थान | | उमा नदीच्या उप नाले व उप नदींची | | उमा नदीचे उप नाले व उप नदींवरील बंधारे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | उगम स्थान | संगम स्थान | एकुण लांबी (.मी.कि) | काठावरील एकुण गांवे | एकुण साखळी बंधाऱ्यांची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | १सात नाला. | तिरखुरा गावांपासून ता. चिमुर | चिमुर शहरा जवळ  ता. चिमुर | १८ कि.मी. | ०२ गावे | ०१ कोल्हापुरी पध्दतींचा बंधारा |
| | २भिसी नाला. | भिसी ल तलावा.पा. चिमुर .पासून ता | सरडपार गावा जवळ ताचिमुर . | ३२  किमी. | १९ गावे | १२  कोल्हापुरी पध्दतींचा बंधारे |
| भिसी नाल्याला जोडणारे उप नाल्यांचे नाव | १उमरी उप नाला . | मालेवाडा गावापासुन  ता . चिमुर | कळमगावा जवळ ताचिमुर . | १२ किमी. | ०३ गावे | |
| | २नवेगाव उप नाला . | नवेगाव बाम्हणी गावापासून ता . चिमुर | नवतळा गावा जवळ ताचिमुर . | १५ किमी. | ०६ गावे | |
| | गोंदरी उप नदी | डोंगरगाव ल तलाव पासून.पा. चिमुर .ता | वडसी गावा जवळ ताचिमुर . | २२ किमी. | १८ गावे | ०७ कोल्हापुरी पध्दतींचा बंधारे |
| गोंदरी नदीला जोडणारे उप नाल्यांचे नाव | मेटेपार उप नाला . | शिवरा गावा पासून ताचिमुर . | नवतळा गावा जवळ ताचिमुर . | १६ किमी. | ०५ गावे | |
| | जामसाळा उप नाला . | नलेश्वर मध्यम प्रकल्प वेस्ट वेअर तासिंदेवाही . | वाकल गावाजवळ तासिंदेवाही . | १३ किमी | ०२ गावे | ०३ सिमेंट नाला बांध |
| | २ बोकडडोह उप . नदी | घोडाझरी मध्यम प्रकल्पाच्या वेस्ट वेअर पासुन  ता . नागभिड | कळमगाव गावाजवळ ता . सिंदेवाही | ४१ किमी. | १८ गावे | ०५ कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे |
| | ३पाथरी उप नदी . | आसोलामेंढा  मोठा प्रकल्पाच्या वेस्ट वेअर पासून ता . .सावली | आकापुर गावा जवळ तामुल . | ३१ किमी. | १० गावे | ०६ कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे |

# उमा नादिंचे खोलीकरण करणाऱ्या ठिकाणा बाबत माहीती

| अ. क्र. | उमा नदी पाणलोट क्षेत्रातील बंधाऱ्यांची माहिती | उपाययोजना | फोटो |
|---|---|---|---|
| १. | उमा नदीत पात्रातील कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा शेडेगाव ता. चिमूर जि. चंद्रपूर | उमा नदीच्या उगमस्थान म्हणजे पिटीचुआ /मुरपार तुकूम ता . चिमूर या गावापासून झाला आहे .पिटीचुआ या गावापासून ३ ते ५ कि.मी .अंतरावर शेडेगाव गाव असून कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा आहे .आहे .नदीचे पात्र साधारणता ६० फुट आहे.या गावाजवळ रेतीची मोठ्या प्रमाणात तस्करी केली जाते . तसेच बंधा-यावर पाट्या टाकणे -काढणे यावर नियोजन नाही त्यामुळे व्यवस्थापणासाठी पाणी वापर संस्था बनविणे, आणि या पात्रात गवती साम्राज्य असल्यामुळे १ ते २ कि.मी . खोलीकरण करणे गरजेचे आहे . | <br> |
| २. | उमा नदीत पात्रातील कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मौजा सोनेगाव बेगडे ता. चिमूर जि. चंद्रपूर | शेडेगाव पासून ३ कि.मी अंतरावर सोनेगाव बेगडे गाव आहे. या गावाला लागूनच नदी व कोल्हापुरी पध्दतीचा फार जुना बंधारा आहे. त्यामुळे नदी पात्रात मोठ्या प्रमाणात गाळ साचलेली असून गवती साम्राज्य राज्य करीत आहे. आणि गावाला पुराचा सामना करावा लागत आहे.या नदीच्या पात्रातील १ कि.मी अंतर गाळ व गवती साम्राज्य साफसफाई करणे, तसेच बंधा-याच्या खालच्या पात्रापासून जवळपास ३ कि.मी. अंतर खोलीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. | <br> |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | उमा नदीत पात्रातील कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा चिमूर शहराच्या जलशुध्दीकरण यंत्राजवळ ता. चिमूर जि.चंद्रपूर | सोनेगाव बेगडे पासून ५ ते ६ कि.मी. अंतरावर कोल्हापुरी बंधारा आहे. चिमूर शहराला लागून नदी वाहत आहे. नदीचे पात्र साधारण असले तरी नदी पात्रात गवती साम्राज्य मोठ्या प्रमाणात आहे. या ठिकाणी बंधा-याच्या खालच्या व वरच्या भागात ५०० मिटर खोलीकरण करणे महत्वाचे आहे. |   |
| ४. | मासळ रोडवरील उमा नदीच्या पात्रात चिमूर नगरपरिषदचा घनकचरा नदी पात्रात | मासळ रोड वरील उमा नदिच्या पात्रात चिमूर नगरपरिषदेचा संपुर्ण घनकचरा नदीच्या पात्रात टाकत असून नदी मोठ्या प्रमाणात प्रदुषित होत आहे. नदीच्या पात्रात गवती साम्राज्य आहे. या पुलाच्या दोन्ही बाजुत १ ते २ कि.मी खोलीकरण करणे गरजेचे आहे. |   |
| ५. | चिमूर शहरातील स्मशानभुमी जवळचा कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा ता. चिमुर | मासळ रोडपासून २ कि.मी. अंतरावर स्मशानभूमी जवळ कोल्हापुरी बंधारा आहे. यातील नदीचे पात्र संपुर्ण गवताने वेडलेले आहे. या ठिकाणी नदीच्या पात्रात शेती असलेले आढळून आले. या भागात रेती अल्प प्रमाणात आहे. बंधा-याच्या खालच्या व वरच्या भागात २ ते ३ कि.मी. खोलीकरण गरजेचे आहे. |   |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | उमा नदी पात्रातील कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा १ मौजा काग ता. चिमुर, जि. चंद्रपूर | चिमुर पासून ३ ते ५ कि. मी. अंतरावर काग गावातील कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा आहे. अगदी गावाला लागूनच नदी वाहत आहे. या गावातील पहिला बंधा-याची भिंत कोसळली असून बंधारा कमकुवत परिस्थितीत आहे .व बंधा-यात पाट्या टाकणे - काढणे याचा नियोजन नाही .तसेच गाव आणि नदीची पात्र एकसमान झाले आहे .गावातील पाण्याची टाकी उमा नदीच्या पात्रातच आहे .या पात्रात गाळ व गवती साम्राज्य असून खोलीकरण ४ कि.मी .अंतर करणे गरजेचे आहे . |   |
| ७. | उमा नदी पात्रातील कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा २ मौजा काग ता. चिमुर, जि. चंद्रपूर | चिमुर पासून ३ ते ५ कि. मी. अंतरावर काग गावातील कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा आहे. अगदी गावाला लागूनच नदी वाहत आहे. या गावातील दुसरा बंधा-याचे बांधकाम अर्धवट आहे .व बंधारा नदीपात्रात कोसळला आहे . नदीपात्रात ठिकठिकाणी गवती झाडे व गाळ साचलेली आहे.बंधा-याच्या खालच्या व वरच्या भागात गाळ व गवती साम्राज्य १ कि.मी. खोलीकरण गरजेचे आहे . |   |
